**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत साडेपाच टक्के वाढ
- प्राप्तिकर विधेयक २०२५ वर चर्चा करण्यासाठी लोकसभेच्या विषय समितीची बैठक नवी दिल्लीत सुरू
- संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत धर्माच्या आधारे प्रतिनिधित्व देण्याच्या प्रस्तावाला भारत, ब्राझिल, जर्मनी आणि जपान या जी फोर देशांचा विरोध
- जगातल्या सर्वात व्यग्र विमानतळांच्या यादीत २०२४ या वर्षात नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाला नववं स्थान

**आणि**

- मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवरच्या एका स्टँडला विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याचं नाव देण्यात येणार

**<><><><><>**

देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत साडेपाच टक्के वाढ नोंदली गेली आहे. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या काळात भारताने ८२० अब्ज ९३ कोटी डॉलर्स किमतीचा माल निर्यात केला. त्याआधीच्या आर्थिक वर्षात निर्यात झालेल्या मालाचं मूल्य ७७८ अब्ज१३ कोटी डॉलर्स होतं. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयातर्फे जाहीर झालेल्या या आकडेवारीनुसार  देशाची व्यापारी तूट २१ अब्ज ५४ कोटी डॉलर्सची राहीली.

**<><><><><>**

प्राप्तिकर विधेयक २०२५ वर चर्चा करण्यासाठी लोकसभेच्या विषय समितीची बैठक नवी दिल्लीत संसद भवनात होत आहे. भाजपा खासदार बैजयंत पांडा हे या ३१ सदस्यीय समितीचे सदस्य आहेत. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विषय समिती आपला अहवाल सभागृहासमोर सादर करेल. प्राप्तिकराशी संबंधित कायद्याचं एकत्रिकरण करणं आणि त्यात सुधारणा करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात प्राप्तिकर विधेयक लोकसभेत सादर करण्यात आलं होतं. त्यानंतर विधेयकाचा मसुदा विषय समितीकडे पाठवण्यात आला होता.

**<><><><><>**

जीईएम अर्थात गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेसने २०२४-२५ या आर्थिक वर्षात १ लाख ३० हजार कोटी जणांचा आरोग्य विमा, जीवन विमा आणि अपघात विमा उतरवला अशी माहिती वाणिज्य आणि उद्योजकता मंत्रालयाने दिली आहे. या वर्षात जीईएमने १० लाख रोजगार दिल्याचंही मंत्रालयानं सांगितलं आहे. जीईएम ग्राहकांना एक सुरक्षित आणि फायदेशीर व्यासपीठ मिळवून देण्यासाठी वचनबद्ध आहे, असं जीईएमचे सीईओ अजय भादू म्हणाले.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत धर्माच्या आधारे प्रतिनिधित्व देण्याच्या प्रस्तावाला भारत, ब्राझिल, जर्मनी आणि जपान या जी फोर देशांनी विरोध केला आहे. अशा प्रकराचं प्रतिनिधित्व संयुक्त राषट्रांच्या परंपरेला छेद देणारं असल्याचं भारताचे स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश यांनी आंतरसरकारी विचारविमर्श बैठकीत काल सांगितलं. सुरक्षा परिषदेत धार्मिक नव्हे तर प्रादेशिक  निकषांवर प्रतिनिधित्व मिळालं पाहिजे अशी भारताची भूमिका त्यांनी मांडली. सुरक्षा परिषदेत

एक मुस्लीम देश स्थायी प्रतिनिधी असावा, असा प्रस्ताव तुर्कियेचे अध्यक्ष रेसेप तय्यब एर्दोगान यांनी मांडला होता. मात्र स्थायी सदस्य आणि सदस्यत्वाविषयीचा निर्णय आमसभेत होईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्रात उद्योग क्षेत्रातल्या गुंतवणुकीच्या संधी, उत्पादनांची निर्यातवृध्दी तसंच औद्योगिक विकासासाठी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद मुंबईत आज सुरू झाली. राज्यातल्या गुंतवणूकदारांना आणि व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देणं, जिल्ह्याच्या विकासाला चालना देणं आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणं, असा गुंतवणूक परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

<><><><><>

मनी लाँडरिंग प्रकरणी सक्तवसुली संचालनालय आज हैद्राबादमधे अनेक ठिकाणी कारवाई करत आहे. सुराणा समूह आणि साई सूर्या विकासकांशी संबंधित मालमत्तांवर छापे टाकण्यात येत आहेत. प्रकल्पांची कामं वेळेवर पूर्ण करुन ताबा देण्यात अपयश आल्याबद्दल या उद्योजकांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

<><><><><>

छत्तीसगडच्या बस्तर प्रदेशात सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत दोन माओवादी अतिरेकी मारले गेले. त्यांच्यावर १३ लाख रुपयांचं बक्षीस लावलेलं होतं. नारायणपूर आणि कोंडागाव जिल्ह्यांच्या हद्दीवर जिल्हा राखीव सुरक्षा दलातर्फे नक्षलविरोधी मोहीम राबवण्यत येत होती. त्यादरम्यान काल रात्री ही चकमक झाल्याचं पोलीस महानिरीक्षकांनी सांगितलं. आतापर्यंत दोन अतिरेक्यांचे मृतदेह आणि एके ४७ सह शस्त्रास्त्र घटनास्थळावरुन पोलिसांना मिळाली आहेत. शोधमोहीम अद्याप सुरु आहे.

<><><><>

जगातल्या सर्वात व्यग्र विमानतळांच्या यादीत २०२४ या वर्षात नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाचा नववा क्रमांक लागला आहे. एअरपोर्टस् काउन्सिल इंटरनॅशनलने जाहीर केलेल्या यादीनुसार, गेल्या वर्षभरात या विमानतळावरून सुमारे ६ अब्ज ६६ कोटींहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. २०२३ या वर्षाच्या तुलनेने ही वाढ ७ पूर्णांक ८ दशांश टक्के इतकी आहे. सर्वात व्यग्र विमानतळांच्या यादीत अमेरिकेतल्या हार्ट्सफील्ड-जॅक्सन अटलांटा आंतरराष्ट्रीय विमानतळाचा क्रमांक पहिला आहे. या विमानतळावरून गेल्या वर्षभरात ९ अब्ज २४ कोटींहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला.

<><><><>

अमेरिकेत ऑलिंपिया इथल्या स्टेट कॅपिटलमध्ये प्रथमच वैशाखीचा सण साजरा करण्यात आला. सिएटलमधल्या भारतीय वाणिज्य दूतावासाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात वॉशिंग्टन राज्याचे गव्हर्नर, मंत्री तसंच वॉशिंग्टनमध्ये राहणाऱ्या शीख समुदायाचे प्रमुख सदस्य उपस्थित होते. वॉशिंग्टन राज्याचे गव्हर्नर बॉब फर्ग्युसन यांनी शीख समुदायाने अमेरिकेत दिलेल्या योगदानाचं आणि वैशाखी सणाच्या आयोजनाचं कौतुक केलं. तसंच, ग्रेटर सिएटल क्षेत्रात १४ एप्रिल हा दिवस वैशाखी दिन म्हणून साजरा करणार असल्याची घोषणा केली.

<><><><>

महसूल गुप्तचर विभागानं नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका व्यक्तीकडून ७५ कोटी रुपयांहून अधिक किमतीचं साडेसात किलोपेक्षा जास्त कोकेन जप्त केलं. अंमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत काल दुबईहून आलेल्या या प्रवाशाची झडती घेतली असता त्याच्याकडे हे कोकेन आढळलं. या कोकेनचा

स्रोत, आणि यामागे एखादं तस्करी जाळं आहे का, याचा शोध घेण्यासाठी महसूल गुप्तचर संचालनालय अधिक तपास करत आहे.

<><><><><>

मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवरच्या एका स्टँडला विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याचं नाव देण्यात येणार आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनने काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला. आणखी दोन स्टँडचं नामकरण बीसीसीआयचे माजी अध्यक्ष शरद पवार आणि माजी क्रिकेटपटू दिवंगत अजित वाडेकर यांच्या नावे करण्याला या बैठकीत मान्यता मिळाली. वानखेडे स्टेडीयम मधे महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, सुनील गावस्कर, विजय मर्चंट आणि दिलीप वेंगसरकर या दिग्गजांच्या नावाचे स्टँड आधीपासूनच आहेत.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सचा सामना आज राजस्थान रॉयल्स बरोबर होईल. दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. दिल्ली कॅपिटल्सने आतापर्यंत पाचपैकी चार सामने जिंकले आहेत, तर राजस्थान रॉयल्सचा संघ सहा पैकी दोन सामने जिंकू शकला आहे.

दरम्यान, काल चंदिगडमध्ये झालेल्या सामन्यात पंजाब किंग्ज संघानं कोलकाता नाईट रायडर्सवर १६ धावांनी विजय मिळवला. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि १५ षटकं आणि ३ चेंडूत सर्वबाद १११ धावा केल्या. कोलकाता नाईट रायडर्स संघ १५ षटकं आणि एका चेंडूत ९५ धावाच करु शकला.

<><><><><>

येत्या २०२८मध्ये होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होणार असून त्यासाठी कॅलिफोर्नियाच्या पोमोना इथं एक स्टेडियम बनवण्यात येणार आहे. ही जागा ५०० एकरात पसरलेली आहे. १४ जुलै ते ३० जुलै २०२८ या दरम्यान अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे ऑलिंपिक स्पर्धा भरणार आहेत. यात क्रिकेट प्रकारात महिला आणि पुरुष गटाचे प्रत्येकी सहा संघ खेळणार आहेत.

**<><><><><>**

पेरु इथं आयोजित आयएसएसफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताने काल प्रत्येकी एक सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली. महिलांच्या १० मीटर एयर पिस्टल स्पर्धेत सुरुचि सिंहने सुवर्ण, तर मनु भाकरने रौप्य पदक जिंकलं. तर पुरुषांच्या १० मीटर एयर पिस्टल स्पर्धेत सौरभ चौधरीने कांस्य पदक जिंकलं.

**<><><><><>**

नाशिक शहरातल्या द्वारका परिसरात काल रात्री जमावानं दगडफेक केल्यामुळे २१ पोलीस जखमी झाले असून पोलिसांच्या तीन वाहनांचंही नुकसान झालं आहे. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमाराला परिस्थिती नियंत्रणात आणण्यात पोलिसांना यश आलं. या परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर दर्गा बांधकामाला हटवण्याचं काम सुरू होतं. परिस्थिती नियंत्रणात आणल्यानंतर आज सकाळी दर्ग्याचं बांधकाम हटवण्यात आल्याची माहिती नाशिक महापालिकेनं दिली आहे.

**//<><><><><>//**